**राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये आनापान साधना वर्ग सुरु करण्याबाबत..**

---

# महाराष्ट्र शासन

**शालेय शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०११/२९६/११/माशि-३**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : ५ ऑक्टोबर, २०११**

## परिपत्रक

विपश्यना रिसर्च इन्स्टिटयूट, धम्मगिरी, इगतपूरी, जिल्हा नाशिक या संस्थेमार्फत विविध कालावधीच्या निवासी विपश्यना शिबिरांचे आयोजन संस्थेच्या स्थानिक केंद्रामध्ये केले जाते. या संस्थेकडून राज्य शासनाच्या "यशदा" या प्रशासकीय प्रशिक्षण केंद्रामध्ये देखील यशस्वीरित्या आयोजन करण्यात येते. त्याचप्रमाणे राज्यातील तसेच अन्य राज्यातील विविध कारागृहांमध्ये देखील कैद्यांसाठी काही शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. राज्याच्या सर्व प्रशासकीय कर्मचा-यांना "विपश्यना" च्या दहा दिवसांच्या शिबिरात भाग घेण्याची सवलत अगोदरच देण्यात आलेली आहे. ही शिबिरे मनाच्या एकाग्रतेद्वारे विचार व आचारांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अत्यंत लाभदायी ठरल्याचे निदर्शनास आले आहे. मुंबई महानगरपालिकेच्या व इतर शाळांमध्ये अनेक वर्षांपासून आनापानाचे वर्ग चालविण्याने विद्यार्थ्यांवर अत्यंत चांगले परिणाम दिसून आले आहेत.

आनापान/विपश्यना साधना पद्धती ही विपश्यना साधना शिकण्याची पहिली पायरी आहे. बालपणी व पौगंडावस्थेत वाटणारी परिक्षेची चिंता, काळजी व ताणतणाव, मुले आनापान साधनेद्वारे अत्यंत आत्मविश्वासाने हाताळू शकतात. याद्वारे स्वतःच्या अंतर्मनामध्ये डोकावून, विचारांना सकारात्मक बनवून, आत्मविश्वास जागृत करून स्वतःच्या आचार व विचारांवर प्रभूत्व मिळविणे मुलांना शक्य होते.

हे प्रशिक्षण तीन टप्प्यांमध्ये देण्यात येते. पहिल्या टप्प्यामध्ये विद्यार्थी, हिंसा, चोरी, खोटे बोलणे, लैंगिक दुर्व्यवहार व मादक पदार्थांचे सेवन इत्यादीपासून दूर राहण्यासाठी प्रयत्नशील राहतात. हा या साधनेचा मुलाधार आहे. या आचरणामुळे विद्यार्थी स्वयंशासनाद्वारे स्वतःच्या अनियमित मनावर नियंत्रण मिळविण्यात यशस्वी होतात. दुस-या टप्प्यामध्ये मुले आनापान क्रियेद्वारे श्वासोच्छवासावर लक्ष केंद्रीत करतात. याद्वारे श्वासाची आत घेण्याची व बाहेर जाण्याची नैसर्गिक क्रिया ते पूर्ण एकाग्रतेने अनुभवतात. तिस-या टप्प्यामध्ये, आनापान क्रियेद्वारे अनुभवलेली मनःशांती व आत्मानंद इतरांमध्ये प्रसारित करण्यासाठी मेत्ता भावना (मैत्री भावना/सर्वांचे मंगल व्हावे ही प्रेरणा) अनुभवतात.

आनापान/विपश्यना साधनेच्या दैनंदिन सरावामुळे, मुलांमध्ये, एकाग्रता वाढते, मनाची जागृतता व सतर्कता वाढते, स्वयंशासन वृद्धींगत होते, स्मरणशक्ती वाढते, निर्णयक्षमता वाढते, आत्मविश्वास वृद्धींगत होतो, भिती, राग चीड, उदासिनता कमी होते, कार्यक्षमता वाढते, अभ्यास, खेळ व अन्य extra curricular activities मध्ये सहभाग वाढतो, असे निदर्शनास आलेले आहे. या साधना पद्धतीमध्ये कोणतेही धार्मिक व कर्मकांड अंतर्भूत नसल्याने, तिचे आचरण, एका सुदृढ मानसिकतेच्या पिढीच्या निर्मितीसाठी अत्यावश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करुन राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये आनापान साधना वर्ग सुरु करण्यात यावेत.

१. आनापान/विपश्यना साधनेचे महत्व, तिचा मुलांच्या मानसिक जडण घडणीमध्ये / वैयक्तिक विकासामध्ये होणारा उपयोग विचारात घेता, ही साधना राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये सुरु करणे अत्यंत आवश्यक आहे.

२. प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी आनापान साधना वर्ग सुरु करण्यात यावेत. या वर्गांचा कालावधी ५ ते ६ तासांचा असावा, यामध्ये मार्गदर्शन व सराव यावर जास्तीत जास्त भर देण्यात यावा.

३. हे साधना वर्ग वर्षातून एकदा आवश्यकतेनुसार शाळेच्या आवारामध्येच आयोजित करण्यात यावेत. साधारणपणे ५० ते १०० मुलांच्या गटाचा एक वर्ग याप्रमाणे एका दिवसामध्ये दोन वर्गांचे नियोजन करण्यात यावे.

४. या वर्गांसाठी, शाळेचा हॉल, किंवा काही वर्गखोल्या निवडण्यात याव्यात, बसण्याची व्यवस्था जमिनीवर सतरंज्या वा चटया अंथरून करता येईल. योग्य सुसंवादासाठी ध्वनिक्षेपकाची व्यवस्था देखील आवश्यकतेनुसार करावी. आवश्यकतेनुसार व गरजेनुसार साध्या व हलक्या भोजनाची व्यवस्था देखील करावयास हरकत नाही. या सर्व सुविधा शाळेने उपलब्ध करून द्याव्यात.

५. आनापान साधना पूर्ण केल्यावर तिचा दैंनदिन सराव होणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येक शाळेमध्ये शाळेच्या सुरवातीची १० मिनिटे आनापान साधना आयोजित करण्यासाठी राखून ठेवण्यात यावीत. त्यासाठी शाळेच्या वेळापत्रकात आवश्यक बदल करण्यात यावेत.

६. आनापान साधना वर्ग सुरु करण्यासाठी, शाळेतील किमान एका शिक्षकाने १० दिवसांचा विपश्यना साधना वर्ग पूर्ण केलेला असणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील इतर शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचा-यांना देखील १० दिवसांचा विपश्यना साधना वर्ग पूर्ण करण्यासाठी शाळेने प्रवृत्त करणे गरजेचे आहे.

७. सर्व शैक्षणिक उपक्रमातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी यांना, संपूर्ण सेवा कालावधीमध्ये एकदा विपश्यना रिसर्च इन्स्टिटयूट, धम्मगिरी, इगतपूरी, जिल्हा नाशिक या संस्थेतर्फे आयोजित/संचलित १० दिवसीय शिबिरास हजर राहण्यासाठी जाण्यायेण्याचा प्रवास कालावधी धरुन १४ दिवस रजा कार्यालयीन कर्तव्य काल (On Duty) म्हणून देण्यात यावी व याकरीता आवश्यक असलेले संबंधित विपश्यना केंद्राकडून प्राप्त झालेले उपस्थितीबाबतचे प्रमाणपत्र आपल्या कार्यालयास सादर करणे बंधनकारक असेल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१११००५११४८५१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(रत्नाकर गायकवाड)**
**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव / मा.
उपमुख्यमंत्री यांचे सचिव
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई(याविषयी योग्य ते प्रसिध्दीप्रत्रक ताबडतोब काढण्यात यावे)
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषद, पुणे.

**Introducing Anapan meditation in all Primary and Secondary Schools of the State**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
School Education Department
Government Circular No. Sankirn2011/296/11/se-3
Mantralaya, Mumbai 400 032
Date : 5th October, 2011

***CIRCULAR***

Vipassana Research Institute, Dhammagiri, Igatpuri, Dist. Nasik conducts various residential vipassana courses of different duration at their local centers. Such courses are also successfully conducted by this institute at Government Training Centre 'Yashada'. Similarly the courses are also being conducted at various jails in the State and other States for the benefit of the prisoners. State Government employees have already been given concession to attend the 10 day vipassana course. It is observed that these courses are beneficial for bringing positive changes in concentration of mind, thinking process and conduct. Anapan meditation courses have been taught for last many years to the children in Mumbai Municipal Corporation and other schools and it has brought very good improvement in the students.

Anapan meditation is the first step in learning Vipassana. Through Anapan courses children are able to face with confidence the fear of examination, anxieties and pressures of childhood and adolescence. Anapan gives them insight into the working of their own minds, making their thought process positive and helps them build inner strength and confidence enabling them to control their conduct and thought process.

This is provided in three steps : In the first step the students practice abstinence from killing, stealing, lying, sexual misconduct and the consumption of intoxicants. These form the foundation of this technique. By observation of these precepts and with the help of self discipline students can successfully control their unruly mind. In the second step through Anapan practice they focus

attention on the breathing process. Thereby they experience the movement of breath as it comes in and goes out naturally. In the third step, through Anapan technique they observe peace of mind and happiness is shared with others through Metta Bhavna.

It is observed that daily practice of Anapan Meditation by children helps them to improve concentration of mind, awareness and alertness of the mind, improves self discipline, increases memory, decision-making power, increases self-confidence, overcome fear, anger, nervousness, increases capacity to work, better performance in studies, sports and extra-curricular activities. There are no rites or rituals involved in the practice of Anapan, therefore practicing it is essential for developing new generation of healthy mind set. In view of the above, it is thought fit to introduce Anapan courses in all Primary and secondary schools in the state.

(1) Considering importance of Anapan / Vipassana technique in benefiting children's mind and personal improvement, it is most essential to start this technique in all primary and secondary schools of the State.

(2) For all the children in the school of standard 5th to 10th the Anapana Course should be introduced. Duration of the course is of 5 – 6 hours with larger emphasis on guidance and practice.

(3) As per requirement, courses shall be held once every year, as per the school timings and within the school premises. A batch of 50 to 100 students is made per course and two courses can be held in a day.

(4) The school is expected to provide a suitable hall and few classrooms for courses. Sitting arrangements, may be of mat or darries need to be arranged by the school. Similarly, audio-video arrangement for effective communication will have to be provided. Wherever possible and as per requirement Light & simple food may be provided for students.

(5) Continuity of practice is essential for children to get the true benefits of the technique. It is therefore for practicing of Anapan keep reserve a short period of 10 minutes each day at the start of schools.

(6) Initially these courses shall be conducted in schools and institutions where at least one of the teachers has gone through the 10 day Vipassana Course and it shall be encouraged to all the teachers and staff to complete at least one 10 day Vipassana Course.

(7) To attend 10 days Vipassana Course organised / conducted by Vipassana Research Institutre, Dhammagiri, Igatpuri, Dist. Nasik, including journey time, 14 days leave treating on duty is granted to all the teachers, officers and staff, once in their service and they will have to submit the certificate of attending course issued by the Vipassana Centre to their office.

This Government Circular is available on the Maharashtra Government website www.maharashtra.gov.in and its ID is 20111005114851001.

Issued by order and on behalf of Governor of Maharashtra.

( Ratnakar Gaikwad )
Chief Secretary,
Govt. of Maharashtra

Sec. to Governor
Sec. to Chief Minister
Sec. to Dy.Chief Minister
All Additional Chief Secretary / Principle Secretary / Secretary
P.S./ P.A. to All Ministers / State Ministers
Maharashtra Legislature Secretariat
Director General, Information & Public Relation, Mumbai
Director Education(Primary) Maharashtra State Pune
Director Education(Secondary and Higher Secondary) Maharashtra State Pune
Director, MPSP Pune.

राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक
शाळांमध्ये मित्र उपक्रम कार्यान्वित करणे

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०११(२९६/११)/माशि-३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २७ जानेवारी २०१२.

## परिपत्रक

शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०११/२९६/११ माशि-३ दि. ५ ऑक्टोबर २०११ नुसार राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांतून आनापान साधना वर्ग सुरु करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदरचा कार्यक्रम राज्यातील सर्व इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत शिकणा-या विद्यार्थ्यांच्या मानसिक व बौध्दिक वाढीकरीता उपकारक ठरणार असल्याने त्यास परिचित नावाने संबोधण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यानुसार उपरोक्त परिपत्रकाप्रमाणे विहित केलेल्या आनापान साधना वर्गास यापुढे 'मित्र उपक्रम' MITRA (Mind In Training for Right Awareness) या नावाने संबोधण्यात येईल. मित्र उपक्रम हा कार्यक्रम महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतर्गत येणा-या सर्व शासकीय शाळा, अनुदानित शाळा, बी.एड., डी.एड. कॉलेज व मान्यता प्राप्त शाळा तसेच आदिवासी विभागांतर्गत येणा-या शासकीय आश्रम शाळा, अनुदानित आश्रमशाळा व वसतिगृह व सामाजिक न्याय द्वारा संचालित शासकीय निवासी शाळा, अनुदानित शाळा व वसतिगृहे इत्यादी मध्ये राबविण्यात येईल. मित्र उपक्रमाची विविध स्तरावरील समित्यांची रचना व कार्यकक्षा याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे राहील.

### राज्यस्तरीय समिती

| | | |
|---|---|---|
| १. | राज्य प्रकल्प संचालक, म.प्रा.शि.प. | अध्यक्ष |
| २. | संचालक, प्राथमिक शिक्षण | सदस्य |
| ३. | संचालक, म.रा.शै.सं.प्र.परिषद | सदस्य |
| ४. | अध्यक्ष, म.रा.मा.व उ.मा.शि.मंडळ | सदस्य |
| ५. | संचालक, सामाजिक न्याय विभाग | सदस्य |
| ६. | आयुक्त, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ७. | उप आयुक्त, शिक्षण, मुंबई महापालिका | सदस्य |
| ८. | संचालक, नगरपालिका प्रशासन | सदस्य |
| ९. | आयुक्त, महिला व बाल कल्याण | सदस्य |
| १०. | श्री. ज. मो. अभ्यंकर, निवृत्त राज्य प्रकल्प संचालक | सदस्य |
| ११. | श्री. एस. एम. शिंदे, सह आयुक्त, मुंबई महापालिका | सदस्य |
| १२. | श्रीमती प्रिती ठेडिया, घाटकोपर, मुंबई | सदस्य |
| १३. | विपश्यना संस्थेचे तीन प्राचार्य प्रतिनिधी | सदस्य |
| १४. | संचालक, माध्यमिक शिक्षण | सदस्य-सचिव |

## राज्य समितीची कामे

१. मित्र उपक्रम कार्यान्वित आणण्यासाठी कमीत कमी एक वेळ १० दिवसांचा विपश्यना अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या शाळानिहाय शिक्षकांची तसेच कमीत कमी तीन विपश्यना शिबीर पूर्ण केलेल्या अन्य साधकांची जिल्हा व तालुकानिहाय यादी प्राप्त करुन साधन व्यक्ती म्हणून ते आपल्या कार्यक्षेत्रातील शाळेत मित्र उपक्रम कार्यान्वित आणण्यास तयार असल्याबद्दलचे त्यांचेकडून संमतीपत्र मिळविणे.

२. अशा साधन व्यक्तींसाठी जिल्हानिहाय मित्र उपक्रम कार्यवाहीत आणण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणाचा व दरवर्षीच्या उद्‌बोधन वर्गाचा आराखडा तयार करणे व प्रत्यक्ष प्रशिक्षण आयोजनाचा कार्यक्रम तयार करणे.

३. प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या सध्या चालू असलेल्या सेवापूर्व व सेवांतर्गत प्रशिक्षण अभ्यासक्रमात विपश्यना अभ्यासक्रम अंतर्भूत करणे व या एकात्मिक अभ्यासक्रमास सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजूरी मिळविणे.

४. सर्व अध्यापक विद्यालयातील प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना अनिवार्य असलेल्या १५ दिवसांच्या निवासी शिबीरात पहिले १० दिवस विपश्यना अभ्यासक्रम व त्यापुढील ५ दिवसांत त्यांचे नियमित अभ्यासक्रमातील १० उपक्रम घेण्याबाबतचा सुधारित कार्यक्रम म. रा. शै. सं. व प्र. परिषदेकडून मान्य करुन घेणे. तसेच अध्यापक विद्यालयातील सर्व शिक्षकांना विद्यार्थ्यांबरोबर विपश्यना अभ्यासक्रम पूर्ण करण्यास प्रवृत्त करणे.

५. विपश्यना रिसर्च इन्स्टिटयूट / विपश्यना इंटरनॅशनल ॲकेडमी, धम्मगिरी, इगतपुरी येथील अथवा अन्य केंद्रावर विशेष शिबीर आयोजित केलेल्या विपश्यना अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या शिक्षकांनी वरिष्ठ वेतन श्रेणीकरिता लागणारी सेवांतर्गत प्रशिक्षणाची अट पूर्ण केली असे समजण्याचा शासनादेश काढण्यासाठी शालेय शिक्षण विभागाकडे प्रस्ताव पाठविणे व मंजूरीकरिता पाठपुरावा करणे.

६. प्रत्येक शैक्षणिक वर्ष अखेर प्रत्येक जिल्ह्यातील किमान १०० शाळांना प्रत्येकी किमान दोन शिक्षक उपलब्ध होतील अशा तऱ्हेने विपश्यना अभ्यासक्रमावरील निवासी विशेष शिबीराचा कार्यक्रम त्यांच्या पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांसह आखणे. विपश्यना संस्थेच्या राज्यातील २७ केंद्राच्या मदतीने जिल्ह्यातील सर्व आवश्यक सुविधा असलेल्या निवासी शैक्षणिक संस्थांतून १५ एप्रिल ते १५ जून, या कालावधीत विपश्यना विशेष शिबीरांचे आयोजन करणे. मित्र उपक्रमाच्या प्रत्यक्ष कार्यवाहीचे एक दिवसीय प्रशिक्षण या शिबीरास जोडून आयोजित करणे. विपश्यना अभ्यासक्रम शिबीरास उपस्थित राहणाऱ्या शिक्षकांना व पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांना प्रवास खर्च देय ठरविणे व निवास, भोजन, प्रशिक्षण इत्यादींवरील खर्च संबंधित शैक्षणिक संस्थेला परस्पर अदा करण्याबाबत शालेय शिक्षण विभागाकडून आदेश प्राप्त करणे.

७. प्रत्येक जिल्ह्यातील विविध प्रकारच्या शाळांशी संबंधित विभागातील किमान २० वरिष्ठ पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांसाठी तसेच राज्यस्तरीय पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांसाठी विपश्यना अभ्यासक्रमांतर्गत शिबीरांचा कार्यक्रम आखणे व त्यानुसार कार्यवाही करणे. विपश्यना रिसर्च इन्स्टिटयुट च्या सर्व केंद्रातील शिबीरामध्ये सदरच्या पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांना प्राधान्याने प्रवेश मिळवून देणे.

८. अधिकारी व शिक्षकांचे विपश्यना शिबीर, शाळापातळीवरील मित्र उपक्रमाचे प्रशिक्षण व प्रत्यक्ष आयोजन, उपक्रम कार्यवाहीचे पर्यवेक्षण, मूल्यमापन व प्रत्याभरण आदि बाबतचा कृति कार्यक्रम तयार करणे.

९. जिल्हा, तालुका व शाळापातळीवरील समित्यांची शासनाच्या व व्ही.आय.ए. यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे स्थापना करणे, त्यांची कामे निश्चित करणे व प्रत्येक पातळीवर सर्व प्रकारच्या पत्रव्यवहारास तसेच कार्यपूर्ती अहवालास जबाबदार असणारी प्रभारी व्यक्ती निश्चित करणे.

१०. राज्य पातळीवर म. प्रा. शि. परिषदेत सर्व शिक्षा अभियानांतर्गत एक सहसंचालक - मित्र उपक्रम चे पद निर्माण करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविणे व मंजूरीस्तव पाठपुरावा करणे.

११. जिल्हा पातळीवर समन्वयक (मित्र उपक्रम) या पदाची निर्मिती करण्याचा व करार पध्दतीने नियुक्ती करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समिती, म. प्रा. शि. प. ला देणे व मंजूरीबाबत पाठपुरावा करणे.

१२. पंचायत समिती पातळीवर कार्यरत विषय तज्ञांपैकी एक पद मित्र उपक्रम तालुका समन्वयक म्हणून वर्गवारीत करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समिती व म. प्रा. शि. प. ला देणे व मंजूरीस्तव पाठपुरावा करणे.

१३. मित्र उपक्रमाच्या प्रगतीचा आढावा, अडचणींवर चर्चा, उपाययोजना व क्षेत्रीय अधिकाऱ्यांसाठी नवीन सूचना या प्रमुख विषयांसह अन्य सर्व अनुषंगिक मुद्यांचा परामर्श घेण्यासाठी राज्यस्तरीय समितीची दरमहा बैठक आयोजित करणे. मासिक बैठकीचा कार्यवृत्तांत नोंदवून त्याची प्रत सर्व संबंधितांना वितरीत करणे.

१४. मित्र उपक्रमाच्या माध्यमातून सुखी, संतुलित व अर्थपूर्ण जीवन जगण्याचे कौशल्य प्रत्यंकात निर्माण करण्याच्या हेतूने राज्यस्तरावरुन पाक्षिक, मासिक अथवा अर्धवार्षिक विशेषांक यापैकी एखाद्या प्रकाशनाचे कार्य व्ही. आर. आय. च्या मार्गदर्शनाखाली सुरु करणे. तसेच जीवन शिक्षण, शिक्षण संक्रमण, किशोर, इत्यादी शासकीय मासिकांतून मित्र उपक्रम विषयक लेख छापून येतील अशी व्यवस्था करणे.

१५. विविध स्तरावर शिक्षकांना देण्यात येणाऱ्या पुरस्काराच्या निकषांत मित्र उपक्रमातील शिक्षकांच्या कामगिरीचा अंतर्भाव करण्यासाठी प्रस्ताव तयार करणे व शासनादेश काढण्यास्तव पाठपुरावा करणे.

१६. शाळा तपासणी अहवाल व शालेय प्रतवारी यांचा नमुना सुधारित करुन त्यात मित्र उपक्रमाच्या प्रगतीबाबतची नोंद घेण्याची व्यवस्था करणे.

१७. शाळांना प्रोत्साहन अनुदान तसेच आदर्श शाळा पुरस्कार देण्याच्या निकषांमध्ये मित्र उपक्रम विषयक कार्याचा समावेश करण्याबाबत शासनास प्रस्ताव देणे व मंजूरीस्तव पाठपुरावा करणे.

## जिल्हा स्तरीय समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | - | अध्यक्ष |
| २. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) | - | सदस्य |
| ३. | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | - | सदस्य |
| ४. | समाज कल्याण अधिकारी वर्ग - १ | - | सदस्य |
| ५. | समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद | - | सदस्य |
| ६. | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) | - | सदस्य |
| ७. | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | - | सदस्य |
| ८. | विपश्यना संस्थेचे दोन शिक्षक प्रतिनिधी | - | सदस्य |
| ९. | सर्व महानगरपालिका शिक्षणाधिकारी | - | सदस्य |
| १०. | जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगरपालिका प्रशासन | - | सदस्य |
| ११. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | - | सदस्य सचिव |

## जिल्हा समितीची कामे

१. मित्र उपक्रम कार्यान्वित आणण्यासाठी कमीत कमी एक वेळ विपश्यना अभ्यासक्रम शिबीर पूर्ण केलेल्या शाळानिहाय शिक्षकांची तसेच कमीत कमी तीन विपश्यना शिबीरे पूर्ण केलेल्या अन्य साधकांची तालुका निहाय यादी प्राप्त करुन ते आपल्या कार्यक्षेत्रातील शाळेत मित्र उपक्रम कार्यान्वित आणण्यास साधन व्यक्ती म्हणून काम करण्यास तयार असल्याबद्दल त्यांची संमती प्राप्त करणे.

२. अशा साधन व्यक्तींसाठी तालुकानिहाय मित्र उपक्रम कार्यवाहीत आणण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणाचा व दरवर्षीच्या उद्बोधन वर्गाचा आराखडा तयार करणे व प्रत्यक्ष प्रशिक्षण आयोजनाचा कार्यक्रम तयार करणे.

३. प्रत्येक तालुक्यातील विविध प्रकारच्या शाळांशी संबंधित विभागातील पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांसाठी तसेच जिल्हास्तरीय पर्यवेक्षीय अधिकाऱ्यासाठी विपश्यना अभ्यासक्रमांतर्गत शिबीराचा कार्यक्रम आखणे व त्यानुसार कार्यवाही करणे. विपश्यना रिसर्च इन्स्टिटयूटच्या सर्व केंद्रातील शिबीरामध्ये सदरच्या पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांना प्राधान्याने प्रवेश मिळवून देणे.

४. विपश्यना शिबीरास स्वेच्छेने जाण्यास उत्सुक असणाऱ्या १०० ते २०० प्राथमिक व माध्यमिक शाळांतील शिक्षकांच्या याद्या तयार करणे व विपश्यना संस्थेच्या समन्वयातून अशा शिक्षकांना त्यांच्या सोयीच्या विशेष

केंद्रावर १५ एप्रिल ते १५ जून पर्यंत विशेष शिबीरात दाखल करुन घेण्याची व्यवस्था करणे व राज्यस्तरीय समितीतील मुद्दा क्र. ८ नुसार कार्यवाही करणे.

५. विपश्यना अभ्यासक्रमाचे शिबीर पूर्ण केलेले शिक्षक व गांव पातळीवरील अन्य इच्छुक साधकांच्या मदतीने संबंधित शाळेत मित्र उपक्रमाची कार्यवाही सुरु करणेस मदत करणे.

६. मित्र उपक्रमाची कार्यवाही सुरु करण्यापूर्वी विपश्यना अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या शिक्षक व अन्य साधकांचे व्ही. आय. ए. संस्थेच्या प्रतिनिधीमार्फत मित्र उपक्रम प्रशिक्षणाचे आयोजन करणे. याशिवाय प्रशिक्षित शिक्षकांच्या उजळणी वर्गाचे दरवर्षी आयोजन करणे.

७. सर्व शिक्षा अभियानांतर्गत कार्यरत कार्यक्रम अधिकाऱ्यांपैकी एका अधिकाऱ्यांकडे मित्र उपक्रमाची जबाबदारी सोपवून मित्र उपक्रमाच्या कार्यवाहीकरिता त्यास पूर्ण वेळ कार्यरत ठेवणे.

८. जिल्हा पातळीवर समन्वयक (मित्र उपक्रम) असे पद निर्माण करण्याचा प्रस्ताव म.प्रा.शि. प. कडे पाठविणे व मंजूरीबाबत पाठपुरावा करणे. पद मंजूरीनंतर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करताना कमीत कमी तीन विपश्यना अभ्यासक्रम शिबीरे पूर्ण केलेल्या व या पदासाठी शैक्षणिक आणि प्रशैक्षणिक अर्हतेबाबतच्या अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या व्यक्तींची समन्वयक पदी नियुक्ती करणेची दक्षता घेणे.

९. पंचायत समिती स्तरावर कार्यरत असलेल्या विषय तज्ञापैकी एका विषय तज्ञाला तालुका मित्र उपक्रम समन्वयक म्हणून नियुक्त करण्याचा प्रस्ताव म.प्रा.शि.प.ला राज्य स्तरीय समिती मार्फत पाठविणे व मंजूरीस्तव पाठपुरावा करणे.

१०. मित्र उपक्रम कार्यवाहीचा आढावा, येणाऱ्या अडचणींबाबत चर्चा व उपाययोजना व प्रमुख विषयांसाठी दरमहा बैठक आयोजित करणे व बैठकीचे इतिवृत्त लिहून त्यांच्या प्रती सर्व संबंधितांना देणे. इतिवृत्ताची प्रत व कार्यक्रम प्रगतीचा अहवाल राज्य समितीला पाठविणे.

११. स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत दिल्या जाणा-या आदर्श शिक्षक पुरस्काराच्या निकषांत शिक्षकांचे मित्र उपक्रमातील योगदान अंतर्भूत करणे.

१२. शिक्षण विस्तार अधिकारी, गट शिक्षणाधिकारी व अन्य क्षेत्रीय अधिका-यांनी त्यांच्या प्रत्येक शाळा भेटी अंती शाळेच्या अभिप्राय नोंदवहीत मित्र उपक्रमाच्या अंमलबजावणीची नोंद घेतली असल्याची खात्री करुन घेणे.

## तालुका स्तरीय समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गट विकास अधिकारी | - | अध्यक्ष |
| २. | गट शिक्षणाधिकारी | - | सदस्य |
| ३. | नगरपरिषद, प्रशासन अधिकारी | - | सदस्य |
| ४. | सर्व शिक्षण विस्तार अधिकारी | - | सदस्य |
| ५. | समाज कल्याण निरीक्षक | - | सदस्य |
| ६. | शिक्षण विस्तार अधिकारी (आदिवासी विकास) | - | सदस्य |
| ७. | विपश्यना संस्थेचे दोन प्रतिनिधी | - | सदस्य |
| ८. | ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी | - | सदस्य-सचिव |

## तालुका समितीची कामे

१. मित्र उपक्रम कार्यान्वित आणण्यासाठी कमीत कमी एक वेळ १० दिवसांचा विपश्यना अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या शाळानिहाय शिक्षकांची तसेच कमीत कमी तीन विपश्यना शिबीरे पूर्ण केलेल्या अन्य साधकांची गाव निहाय यादी प्राप्त करुन साधन व्यक्ती म्हणून ते आपल्या कार्यक्षेत्रातील शाळेत मित्र उपक्रम कार्यान्वित आणण्यास तयार असल्याबद्दल त्यांचेकडून संमतीपत्र मिळविणे.

२. अशा संमती देणाऱ्या शिक्षक व अन्य साधकांचे जिल्हा मुख्यालयी जेव्हा मित्र उपक्रमाबाबत प्रशिक्षण होईल तेव्हा या सर्व साधकांना प्रशिक्षणास व दरवर्षी आयोजित होणाऱ्या उजळणी वर्गास उपस्थित ठेवणे. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या साधकांना मित्र उपक्रमातील शाळा निश्चित करून उपक्रमाची अंमलबजावणी सुरू करणे.

३. तालुक्यातील सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना विपश्यना अभ्यासक्रम शिबीर पूर्ण करण्यास प्रवृत्त करून अशा अधिकाऱ्यांची नावे जिल्हा स्तरीय समितीच्या समन्वयकाकडे पाठविणे.

४. तालुक्यातील सर्व शाळांतील किमान दोन शिक्षकांना विपश्यना अभ्यासक्रम शिबीराकरिता उपस्थित राहण्यास प्रवृत्त करणे व त्यापैकी विशेष शिबीरातील प्रवेश क्षमता विचारात घेऊन जादा विद्यार्थी संख्येच्या शाळेतील शिक्षकांना प्राधान्य देऊन तालुक्यातील निश्चित केलेल्या संख्येइतक्या शिक्षकांच्या यादया जिल्हा समितीस पाठविणे.

५. पंचायत समितीमध्ये कार्यरत विषय तज्ञांपैकी एका तज्ञाकडे मित्र उपक्रम कार्यवाहीचे काम सोपविण्यात यावे व त्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेणे. सदर विषय तज्ञांचे विपश्यना अभ्यासक्रम शिबीर प्राधान्याने पूर्ण करुन घेणे.

६. मित्र उपक्रम कार्यवाहीचा आढावा घेण्याकरिता, शिक्षकांच्या विपश्यना शिबीराच्या उपस्थितीचा पाठपुरावा करण्याकरिता येणाऱ्या अडचणी व उपाययोजनेवर चर्चा करण्याकरिता दरमहा बैठकीचे आयोजन करणे. इतिवृत्त तयार करुन त्यांच्या प्रती सभासदांना व जिल्हा समितीच्या अध्यक्षाला पाठविणे. मित्र उपक्रमांतर्गत प्रगतीचा मासिक अहवाल जिल्हा समितीच्या अध्यक्षाला पाठविणे.

७. विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक व तालुकांतर्गत पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांना मित्र उपक्रमाच्या लाभासंबंधी येणारे अनुभव यासंबंधित लेख जिल्हा समितीमार्फत राज्य समितीकडे पाठविणे.

८. आदर्श शिक्षक, शाळा व शैक्षणिक संस्था यांना देण्यात येणाऱ्या पुरस्काराकरिता शिफारस करतांना संबंधितांचे मित्र उपक्रमातील योगदान विचारात घेणे.

९. तालुका, बीट व केंद्र स्तरावरील अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळांतून मित्र उपक्रम सुरु केल्याची खात्री करुन घेणे. सर्व शिक्षकांचे विपश्यना शिबीर, प्रशिक्षण, परिपाठातील प्रत्यक्ष कार्यवाही पार पडत असल्याची खात्री करुन घेणे.

१०. मित्र उपक्रमाअंतर्गत शालेय स्तरावर एक दिवसीय शिबीर आयोजित करून उपक्रमाची सुरुवात तसेच शाळा सुरु होताना व शाळा संपण्यापूर्वी दरदिवशी दिलेल्या ऑडिओ कॅसेट द्वारा मित्र साधनेचा अभ्यास करण्यासाठी शाळा समितीला मदत करणे आणि दिलेले साधन सामुग्री (ऑडिओ कॅसेट) नुसारच कार्यवाही होईल याची खात्री करणे. विहित कार्यपध्दतीचा अवलंब न केल्यास अशा अभ्यास कार्यपध्दतीची कार्यवाही थांबवून जिल्हा समितीला अहवाल सादर करणे. जिल्हा समितीच्या सहाय्याने दरवर्षी उजळणी वर्ग घेऊन मित्र उपक्रम योग्य रितीने संबंधित शाळेत सुरु असल्याची खात्री करुन घेणे.

## शाळा स्तरीय समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मुख्याध्यापक | - | अध्यक्ष |
| २. | पालक शिक्षक संघातील पालक प्रतिनीधी (दोन) | - | सदस्य |
| ३. | स्थानिक विपश्यना साधक (दोन) | - | सदस्य |
| ४. | एक विद्यार्थी व एक विद्यार्थीनी | - | सदस्य |
| ५. | विपश्यना अभ्यासक्रम पूर्ण केलेला ज्येष्ट शिक्षक | - | सदस्य-सचिव |

## शाळा समितीची कामे

१. मित्र उपक्रम कार्यान्वित आणण्यासाठी कमीत कमी एक वेळ १० दिवसांचा विपश्यना अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या शिक्षकांची तसेच कमीत कमी तीन विपश्यना शिबीर पूर्ण केलेल्या अन्य साधकांची गाव निहाय

याची प्राप्त करुन साधन व्यक्ती म्हणून ते आपल्या कार्यक्षेत्रातील शाळेत मित्र उपक्रम कार्यान्वित करण्यास तयार असल्याबद्दल त्यांचेकडून संमतीपत्र मिळविणे.

२. विपश्यना अभ्यासक्रम पूर्ण करणा-या शिक्षक व अन्य साधकांचे मित्र उपक्रमाबाबतचे प्रशिक्षण जेव्हा आयोजित करण्यात येईल त्यावेळी त्यांना प्रशिक्षणास उपस्थित ठेवणे.

३. सभागृह अथवा वर्गखोलीचा मित्र उपक्रमाकरिता वापर करण्यापूर्वी तेथील भौतिक वातावरण विद्यार्थ्यांचे चित्त विचलित करणारे नाही, याची खात्री करुन घेणे.

४. विपश्यना शिबीर केलेल्या व मित्र उपक्रमाचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या शिक्षक व अन्य साधकाच्या मदतीने मित्र उपक्रमाची कार्यवाही इयत्ता ५ वी ते १० वी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी सुरु करणे. मित्र उपक्रमाअंतर्गत शालेय स्तरावर एक दिवसीय शिबीर आयोजित करुन उपक्रमाची सुरुवात करणे. तसेच शाळा सुरु होताना (परिपाठांतर्गत) व शाळा संपण्यापूर्वी दररोज दिलेल्या ऑडिओ कॅसेट द्वारा मित्र साधनेचा अभ्यास करणे आणि दिलेले साधन सामुग्री (ऑडिओ कॅसेट) नुसारच कार्यवाही होईल याची खात्री करणे. विहित कार्यपध्दतीचा अवलंब न केल्यास असा अभ्यास कार्यपध्दतीची कार्यवाही थांबवून तालुका समितीला अहवाल सादर करणे. तालुका समितीच्या सहाय्याने परत उजळणी वर्ग घेऊन मित्र उपक्रम योग्य रितीने संबंधित शाळेत सुरु असल्याची खात्री करुन घेणे.

५. मित्र उपक्रमाअंतर्गतचा अभ्यास इयत्ता ५ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांकडून बंदिस्त सभागृहात करुन घ्यावा. सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेण्याची क्षमता असलेले सभागृह शाळेत उपलब्ध नसल्यास मित्र उपक्रमांतर्गतचा अभ्यास वर्ग खोलीत आयोजित करणे.

६. मित्र उपक्रमांतर्गत अभ्यासाच्या वेळी सभागृह अथवा वर्ग खोलीत परिपूर्ण शांतता व शिस्त पाळली जाईल याची दक्षता घेणे.

७. मित्र उपक्रमांतर्गत अभ्यासाचा संबंध मनाच्या एकाग्रतेशी असल्याने मुख्याध्यापक व सर्व शिक्षक या उपक्रमास परमोच्च महत्त्व देत असून त्यांच्यात गांभिर्य निर्माण झाले आहे याची खात्री करुन घेणे व मित्र उपक्रमाच्या अभ्यासात सर्व शिक्षक व इतर कर्मचारी सहभागी होत असल्याची खात्री करणे.

८. शाळा स्तरावर विपश्यना विषयक अभ्यासक्रम शिबीर केलेल्या ज्येष्ठ शिक्षकाची मित्र उपक्रम प्रभारी म्हणून नियुक्ती करणे.

९. तालुका समिती अध्यक्षाला उपक्रम प्रगतीचा अहवाल दरमहा पाठविणे.

१०. मित्र उपक्रमाची सुरु असलेली कार्यवाही व येणा-या अडचणी याबाबत चर्चा करण्याकरिता दरमहा बैठकीचे आयोजन करणे व इतिवृत्ताची प्रत तालुका समिती अध्यक्षास पाठविणे.

वर नमूद केल्याप्रमाणे विविध स्तरावरील समित्यांनी आपल्या जबाबदा-या सक्षमतेने पार पाडाव्यात. सदर समित्यांना आपली कामे परिणामकारकपणे पार पाडता यावीत यासाठी पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

डी.एड /बी.एड च्या अभ्यासक्रमातील मित्र उपक्रमाचा अंतर्भाव, वरिष्ठ श्रेणीकरिता विपश्यना अभ्यासक्रमाचे प्रमाणिकीकरण, मित्र उपक्रम प्रशिक्षणाचे व प्रशिक्षण साहित्याचे व्यवस्थापन, विविध प्रोत्साहनपर योजनांच्या निकषात मित्र उपक्रमातील उत्कृष्ट कार्यवाहीचा अंतर्भाव, विविध पातळीवरील स्वतंत्र पदांची निर्मिती अथवा पदनामातील बदल या सर्व शालेय शिक्षण विभागाशी निगडीत विषयाबाबतचे शासनादेश निर्गमित करण्याची जबाबदारी प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचेकडे राहील. तसेच आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय विभागामार्फत संचालित आश्रमशाळा/निवासी शाळा व वसतिगृहे यामध्ये मित्र उपक्रम राबविण्याची जाबाबदारी व त्यासंबंधी निर्देश देण्याची /परिपत्रक काढण्याची जबाबदारी संबंधित विभागांचे प्रधान सचिव / सचिव यांची राहील. तसेच, महानगरपालिका व नगरपालिका संचालित शाळा व अनुदानित तसेच अन्य मान्यता प्राप्त शाळा यांमध्ये मित्र उपक्रम राबविण्याची जबाबदारी तसेच त्यांना निर्देश /परिपत्रक काढण्याची जबाबदारी प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांची राहील. विशेष विपश्यना अभ्यासक्रम शिबीराची पडताळा सूची तयार करणे, विविध पातळीवरील प्रभारी अधिकारी व अन्य वरिष्ठ अधिका-यांचे प्राधान्याने विपश्यना शिबीर घडवून आणणे हया व अन्य सर्व संनियंत्रण विषयक जबाबदा-या डॉ.श्री.पी.एस.मीना, प्रधान सचिव,

सामाजिक विकास समन्वय, सामान्य प्रशासन विभाग हे पार पाडतील. मित्र उपक्रमाचा व्याप लक्षात घेता त्यांना प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, सचिव, सामाजिक न्याय विभाग, प्रधान सचिव (महिला व बाल विकास), प्रधान सचिव (शालेय शिक्षण विभाग), प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) व प्रधान सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग सर्वतोपरी सहकार्य करतील.

विभागीय आयुक्त व महानगरपालिका आयुक्त हे आपल्या मासिक आढावा बैठकीत मित्र उपक्रम कार्यवाहीचा संदर्भित परिपत्रकाच्या अनुषंगाने तपशिलवार आढावा घेतील व क्षेत्रीय भेटीच्या वेळी कार्यक्रम अंमलबजावणीची पाहणी करून आपला निरिक्षण अहवाल शासनाकडे सादर करतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२०९२८११२८०७१८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(संजय कुमार)
प्रधान सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
२. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
३. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव.
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
५. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
६. सर्व विभाग प्रमुख, मंत्रालयीन विभाग.
७. सर्व विभागीय आयुक्त.
८. सर्व महानगरपालिका आयुक्त.
९. आयुक्त, आदिवासी विकास विभाग.
१०. आयुक्त, समाज कल्याण.
११. आयुक्त, महिला व बाल कल्याण विभाग.
१२. सर्व जिल्हाधिकारी.
१३. सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग.
१४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१५. संचालक, नगरपालिका प्रशासन.
१६. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद.
१७. सर्व प्रकल्प अधिकारी, आदिवासी विभाग.
१८. सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण.
१९. सर्व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.
२०. सर्व जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी.
२१. संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

२२. संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण
२३. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
२४. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
२५. संचालक, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे.
२६. संचालक, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था (बालचित्रवाणी), पुणे.
२७. महासंचालक, यशदा, पुणे.
२८. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
२९. उपायुक्त, शिक्षण, मुंबई महानगरपालिका.
३०. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
३१. सर्व प्राचार्य, जिल्हा व प्रशिक्षण संस्था, (डायट).
३२. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक /माध्यमिक/प्रौढ).
३३. सर्व कार्यासने, शालेय शिक्षण विभाग.
३४. सर्व कार्यासने, उच्च व तंत्र शिक्षण विभाग.
३५. सर्व उपायुक्त / सर्व सहाय्यक आयुक्त, नगरपालिका प्रशासन.
३६. श्री.अरूण तोष्णीवाल, ट्रस्टी सयाजी ऊबा ड्रिम ट्रस्ट, इगतपुरी.
३७. श्री.एस.एस.शिंदे, सह आयुक्त, मुंबई महानगरपालिका.
३८. श्री.ज.मो.अभ्यंकर, निवृत्त. राज्य प्रकल्प संचालक.
३९. श्रीमती प्रीती डेडिया, घाटकोपर, मुंबई.
४०. सर्व शिक्षणाधिकारी, महानगरपालिका.
४१. सर्व मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका.
४२. सर्व जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगरपालिका प्रशासन
४३. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
४४. संचालक, बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
४५. सर्व विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय मंडळे

*Translated from Marathi*

**Directorate of Education**

**(Secondary and Higher Secondary**

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Central Building, Dr. Annie Besant Road, Pune 411001
e-mail: doesecondry@gmail.com
Website: www.mahdoesecondary.com

Tel: (020) 26121394/96
Fax: (020) 26132145
Outward No. Sankirn-2012/Vipassana/15C (8)/6601
Secondary and Higher Secondary, Pune- 411001

Date: 11(12)/07/2012

**(1) Background:-**

Vide Government circular no. MISC-2011/296/11/MS-3 dated 5th Oct. 2011 and circular no. MISC-2011/296/11/MS-3 dated 27th Jan. 2012 directives were issued to all the Primary and Secondary Schools in the State to start the Anapana Meditation Course. The project is going to help the children 5th standard to 10th standard in their mental and intellectual growth.

Anapana meditation is the first step in learning Vipassana. Through Anapana courses children are able to face with confidence the fear of examination, anxieties and pressures of childhood and adolescence. Anapana gives them insight into the working of their own minds, making their thought process positive and helps them build inner strength and confidence enabling them to control their conduct and thought process.

This is provided in three steps. In the first step the students practice abstinence from killing, stealing, lying, sexual misconduct and the use of intoxicants. These form the foundation of this technique. By observation of these precepts students can successfully control their unruly mind with the help of self discipline. In the second step through Anapana practice they focus attention on the breathing process. Thereby they experience the movement of breath as it comes in and goes out naturally. In the third step, through Anapana technique the observed peace of mind and happiness is shared with others through Metta Bhavna.

